

कोलवा खाडीचे प्रदूषण गंभीर

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



योग केल्याने शरीर, मन निर्मळ

पान ४ वर

वेर्णा, गुरूवार, २७ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 204 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 27 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# गोव्याचे यंदाचे बजेट २७ हजार ९९३ कोटींचे!

## २०२५ -२६च्या अर्थसंकल्पात शिक्षण आणि आरोग्यासाठी मोठी तरतूद : सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवीन पेन्शन योजना

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ : राज्यातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देत मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी बुधवारी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महसूल अधिशेषाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात ग्रामीण भागात तारांकित हॉटेल्स उभारणाऱ्या पर्यटन उद्योजकांसाठी प्रोत्साहने, अन्न प्रक्रिया उद्योगास चालना, कौशल्य विकास तसेच शैक्षणिक क्षेत्रासाठी विशेष तरतूदी करण्यात आल्या आहेत.**

राज्याच्या उत्पन्नाचा अंदाज २७,९९३.९७ कोटी रुपये असून, हे मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत १३.०२% ने अधिक आहे. तर, एकूण खर्च २८,१६२ कोटी रुपये असणार आहे, त्यात महसुली खर्च २०,२९९ कोटी आणि भांडवली खर्च ७,८६३ कोटी रुपये असेल. मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की २०२५-२६ मध्ये, १,५०४ कोटी रुपयांच्या खुल्या बाजार कर्जाची परतफेड केली जाईल, जी मागील वर्षाच्या तुलनेत ७०४ कोटी रुपयांनी अधिक आहे.

पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी दुर्गम भागात थ्री स्टार किंवा त्याहून अधिक दर्जाच्या हॉटेल्स आणि रुग्णालयांना राज्य जीएसटी वर ५०% सवलत, मुद्रांक शुल्कात सवलत आणि अन्य प्रक्रिया शुल्क माफ करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.राज्यातील पर्यटन स्थळांवर वीज, पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी सिंगल विंडो' प्रणाली लागू केली जाणार आहे. याशिवाय, बोंडला, म्हादेई, नेत्रावली आणि अन्य अभयारण्यात पर्यावरण पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, ५,००० कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना जीएसटी परतावा, मुद्रांक शुल्कात सवलत आणि इतर कर लाभ मिळतील. तसेच, गोव्यातील काजू प्रक्रिया उद्योगांसाठी खेळत्या भांडवलावरील व्याजात सवलत देण्याची घोषणा करण्यात आली आहे . राज्यातील रुग्णवाहिका सेवा बळकट करण्यासाठी १०८ नंबरच्या आणखी १० रुग्णवाहिका घेतल्या जाणार आहेत.दोन्ही जिल्हा रुग्णालयांत डे केअर कॅन्सर सेंटर्स स्थापन केली जाणार आहेत.शालेय शिक्षणासाठी २,१०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.शाळांमध्ये कोडिंग आणि रोबोटिक्स शिकवण्यासाठी १९ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

गृह आधार योजनेसाठी २४८ कोटी रुपये आणि लाडली लक्ष्मी योजनेसाठी ५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत . अंगणवाडी सेविकांच्या वेतनात १,००० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवीन पेन्शन योजना लागू करण्याची घोषणा करण्यात आली आहे

गोव्याचा सर्वांगीण विकास आणि आर्थिक स्थिरता हे आमच्या अर्थसंकल्पाचे मुख्य उद्दीष्ट आहे. पर्यटन, आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करून राज्याचा विकास वेगवान करण्याचा आमचा संकल्प आहे,असे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यावेळी म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पानुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सकल राज्य देशांतर्गत उत्पादन १,३८,६२४.८४ कोटी रुपये राहणार असून, त्यात १४.२७ टक्के वाढ अपेक्षित आहे. दरडोई उत्पन्न ९.६९ लाख रुपये असून, त्यात १३.२ टक्के वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अंदाजे उत्पन्न २७,९९३.९७ कोटी रुपये राहील, जे २०२४-२५ च्या तुलनेत १३.०२ टक्के अधिक आहे. एकूण खर्च २८,१६२ कोटी रुपये असण्याचा अंदाज असून, त्यातील २०,२९९ कोटी रुपये महसुली तर ७,८६३ कोटी रुपये भांडवली खर्चासाठी आहेत. याशिवाय, २०१४-१५ मध्ये घेतलेल्या १,५०४ कोटी रुपयांच्या खुल्या बाजारातील कर्जाची परतफेड करण्यात येणार असून, ही रक्कम मागील वर्षाच्या तुलनेत ७०४ कोटी रुपयांनी अधिक असेल.

पर्यटन क्षेत्राच्या वाढीसाठी एक खिडकी यंत्रणेद्वारे वीज, पाणी आणि सांडपाणी जोडणी यासह सर्व पायाभूत सुविधा पुरवण्यात येणार आहेत. डिचोली , सांगे ,काणकोण , केपे , धारबांदोडा , फोंडा आणि सत्तरी या दुर्गम तालुक्यांमध्ये किमान थ्री स्टार दर्जाचे हॉटेल्स व रुग्णालय स्थापन करणाऱ्या गुंतवणूकदारांना राज्य जीएसटीवर ५०% सूट, मुद्रांक शुल्कात सवलत आणि नोंदणी शुल्कात सवलत दिली जाणार आहे.

राज्यातील सहा प्रमुख वन्यजीव अभयारण्यांमध्ये - बोंडला, भगवान महावीर, खोतीगाव, म्हादई, नेत्रावळी आणि सलीम अली - निसर्ग मार्ग, इको-टुरिझम उपक्रम व कॉटेजसाठी विशेष प्रोत्साहन योजना राबवली जाणार आहे. आरोग्य सेवा सुधारण्यासाठी १०८ रुग्णवाहिकांची खरेदी केली जाईल, तसेच दोन्ही जिल्हा रुग्णालयांमध्ये डे-केअर कर्करोग केंद्रे स्थापन केली जातील. चिखली , फोंडा आणि काणकोण रुग्णालयांच्या सुविधा आणि मनुष्यबळ वाढवण्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. दोन्ही जिल्हा रुग्णालयांच्या अपग्रेडेशनसाठी प्रत्येकी पाच कोटी रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत.

५,००० कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना पुढील पाच वर्षांसाठी संपूर्ण एसजीएसटी परतफेड, स्टॅम्प ड्युटी आणि नोंदणी शुल्कात ५०% सूट, तसेच विविध सुविधांवर अनुदान देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. काजू प्रक्रिया उद्योगाला खेळत्या भांडवलावरील व्याजात सवलत दिली जाणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्लस्टरसाठी समर्पित कॉरिडॉर उभारण्यात येणार आहे. राज्यातील सर्व मासेमारी जेट्टींच्या उन्नतीकरणासाठी विशेष निधी देण्यात येणार असून, स्वच्छता आणि मासे प्रक्रिया सुविधा सुधारल्या जातील. १९९८ पासून गोवा एससी-ओबीसी कॉर्पोरेशनकडून दिलेल्या ५,००० ते १०,००० रुपयांच्या लहान कर्जांचे संपूर्ण माफ करण्यात येणार आहे.

शालेय शिक्षणासाठी २,१०० कोटी रुपये, तर कोडिंग आणि रोबोटिक्स शिक्षणासाठी १९ कोटी रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत. सर्व प्रयोगशाळांचे अद्ययावतीकरण करण्यात येईल. गृह आधार योजनेसाठी २४८ कोटी रुपये आणि लाडली लक्ष्मी योजनेसाठी ५० कोटी रुपये देण्यात येणार असून, लाभार्थ्यांना दर महिन्याच्या १० तारखेला थेट आर्थिक मदत मिळणार आहे.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एकीकृत पेन्शन योजना लागू केली जाणार आहे. याशिवाय, अंगणवाडी सेविकांच्या वेतनात १,००० रुपयांची वाढ करण्याची घोषणा करण्यात आली आहे.

मडगाव येथील दिंडी उत्सव आणि शिरगाव येथील श्री लहराई जत्रा हे राज्य उत्सव म्हणून घोषित करण्यात आले आहेत. सरकारी रिक्त पदे कर्मचारी निवड आयोगामार्फत लवकर भरली जातील, यासाठी गोवा लोकसेवा आयोगासाठी १५ कोटी रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत. राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी प्रस्तावित अर्थसंकल्प विविध क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणारा असून, त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकार प्रयत्नशील राहील, असे मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले.



## निवडक

### मेहुल चोक्सी बेल्जियममध्येच

**नवी दिल्ली, दि. २६ :** पंजाब नॅशनल बँकेत हजारो कोटींचा घोटाळा करून फरार झालेला आरोपी मेहुल चोक्सी हा बेल्जियममध्येच असल्याचे बेल्जियमच्या परराष्ट्र मंत्रालयाने कबूल केले आहे. तसेच देशाचे परराष्ट्र अधिकारी मेहूल चोक्सीच्या प्रत्यार्पणासाठी आमच्या संपर्कात असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

मेहूल चोक्सी हा गेली अनेक वर्ष अँटिग्वामध्ये राहत होता. आता काही दिवसांपूर्वी तो तिथून पसार झाला असून त्याने बेल्जियममध्ये आश्रय घेतला आहे. मेहूल चोक्सीची पत्नी प्रीती चोक्सी ही बेल्जियमची नागरिक आहे. तिच्यासोबत बेल्जियममधील अँटवर्प येथे एफ रेसिडेन्सी कार्ड मिळवून राहत आहे. रेसिडेन्सी कार्ड मिळवण्यासाठी त्याने बेल्जियमच्या प्रशासनाला बनावट कागदपत्रे सादर केल्याची माहिती समोर येत आहे. तो आजारपणासाठी अँटिग्वा सोडून गेल्याची माहिती देण्यात आली होती. मेहूल चोक्सी हा १३ हजार ५०० कोटी रुपयांच्या पीएनबी घोटाळ्यातील आरोपी आहे. मेहूल चोकसीचा भाचा नीरव मोदी हा देखील या प्रकरणातील सहआरोपी आहे.

---

### अतिशी यांच्या अडचणीत वाढ

**नवी दिल्ली, दि. २६ :** दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री अतिशी यांना बुधवारी नोटीस बजावली. दिल्ली विधानसभा निवडणुकीत झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून त्यांच्या निवडणुकीला आव्हान देणाऱ्या याचिकेवर न्यायालयाने अतिशी यांना नोटीस बजावली आहे. न्यायमूर्ती ज्योती सिंह यांनी केंद्रीय निवडणूक आयोग, दिल्ली पोलिस आणि कालकाजी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकाऱ्यांनाही या याचिकेवर नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जुलैरोजी होणार आहे. कमलजीत सिंग दुग्गल आणि आयुष राणा यांनी अतिशी यांच्या आमदार म्हणून कालकाजी विधानसभा मतदारसंघातील निवडीला आव्हान दिले आहे. दोन्ही याचिकाकर्ते कालकाजी परिसरातील रहिवासी आहेत. अतिशी आणि त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींनी निवडणुकीदरम्यान भ्रष्ट पद्धतींचा अवलंब केल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

---

### संजय कुमार मिश्रा 'पीएम'चे नवे सचिव

**नवी दिल्ली, दि. २६ :** सक्तवसुली संचालनालयाचे (ईडी) माजी प्रमुख संजय कुमार मिश्रा यांची पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेत (ईएसी-पीएम) सचिव पदावर पूर्णवेळ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीची अधिकृत घोषणा होईपर्यंत कमालीची गोपनीयता पाळण्यात आली होती. संजय कुमार मिश्रा यांची २०१८ मध्ये ईडी प्रमुखपदी नियुक्ती झाली होती. यानंतर त्यांना वारंवार मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर अखेर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना तिसऱ्यांदा दिलेली मुदतवाढ 'बेकायदेशीर' घोषित केली होती. यानंतर आता त्यांची आर्थिक सल्लागार परिषदेत (ईएसी-पीएम) सचिव पदी नियुक्ती करण्यात आले आहे.

### हवामान

कमाल : ३६ किमान : २६

आर्द्रता : ६३

### बाजार भाव

सोने : ₹ ९०,५८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ १००३०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७२,३६५ .७७↑ (१२३.२०)

निफ्टी : २२,२३५.९० ↑ (८३.३२)

# अक्षय पात्रा सुरू करण्यावरून खडाजंगी

## बचत गटांचे संरक्षण कायम राहणार असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६ :** राज्यातील स्वयंसहायता गटांकडून पुरवठा होणाऱ्या मध्यान्ह भोजनात दर्जाविषयक तक्रारी येत असतानाही सरकार या गटांचे संरक्षण करेल, असे आश्वासन मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी बुधवारी विधानसभेत दिले. फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी मात्र विधानसभेत केलेल्या खुलाश्यात, अक्षय पात्रा फाऊंडेशनच्या ५२ स्वयंपाकघरांपैकी निम्म्या स्वयंपाकघरांमध्ये अन्नधान्य आणि निधी गैरव्यवस्थापन झाल्याचा आरोप केला.

मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, शालेय विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पुरवठा करणाऱ्या स्वयंसहायता गटांना बाजूला केले जाणार नाही. विरोधी पक्षाने यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडल्यानंतर उत्तर देताना, सावंत यांनी सांगितले की, शिक्षण संचालनालयाच्या योजनेनुसार, कोणत्याही बचत गटाला माध्यान्ह भोजन पुरवण्यापासून रोखले जाणार नाही. मात्र, हा पुरवठा केंद्र सरकारच्या २००६ च्या राष्ट्रीय प्राथमिक शिक्षण पोषण सहाय्य कार्यक्रम आणि इतर मार्गदर्शक तत्त्वांनुसार असेल, अन्यथा करार रद्द केला जाईल.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले की, राज्यातील कोणत्या शाळांना 'अक्षय पात्रा फाऊंडेशन'कडून माध्यान्ह भोजनाचा पुरवठा केला जाईल, याचा अंतिम निर्णय सरकारने अद्याप घेतलेला नाही.

सरकारने माध्यान्ह भोजन पुरवठ्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली होती, ज्यात घनश्याम सेवा समिती (दिल्ली), केंद्रीय भांडार (मुंबई), नॅशनल फेडरेशन ऑफ फार्मर्स, प्रोक्युरमेंट, प्रोसेसिंग अँड रिटेलिंग कोऑपरेटिव्हज ऑफ इंडिया लिमिटेड , स्त्री शक्ती (मुंबई) आणि अक्षय पात्रा फाउंडेशन (बंगळुरू) यांनी आपापल्या निविदा सादर केल्या होत्या. सखोल पडताळणी केल्यानंतर, बेंगळुरू स्थित अक्षय पात्रा फाउंडेशन'ची निवड करण्यात आली.

फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी विधानसभेत दावा केला की, अक्षय पात्रा फाऊंडेशन विद्यार्थ्यांवर विशिष्ट आहार लादण्याचा प्रयत्न करत आहे. त्याचप्रमाणे, त्यांनी राज्यातील सर्व स्वयंसहायता गटांना एकत्र आणून त्यांना या केंद्रीय योजनेसाठी बोली लावण्याची संधी द्यावी, अशी मागणी केली. सरकारच्या या निर्णयावर पुढील टप्प्यात काय निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पर्यटनमंत्र्यांच्या भूमिकेवर विधानसभेत चर्चा

## परदेश दौऱ्यांसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केल्याच्या मुद्द्यावरून विरोधक आक्रमक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६ :** परदेश दौऱ्यांसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केल्याच्या मुद्द्यावरून विरोधकांनी बुधवारी विधानसभेत पर्यटनमंत्री रोहन खंवटे यांना घेरले. पर्यटनाच्या नावाखाली सरकारी निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोप करत, या दौऱ्यांचे प्रत्यक्ष परिणाम आणि लाभांविषयी सरकारकडून स्पष्टता मागितली.

खंवटे यांनी मात्र पर्यटन विभागाच्या सहभागाचा बचाव करत, गोव्याच्या आंतरराष्ट्रीय पर्यटन ओळखीसाठी जागतिक मंचांवर उपस्थिती आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आणि उच्चस्तरीय पर्यटक आकर्षित करण्याच्या दृष्टीने हे प्रयत्न महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

केपेचे आमदार एल्टॉन डिकॉस्टा यांनी या परदेश दौऱ्यांच्या उपयुक्ततेबद्दल प्रश्न उपस्थित करत, हे दौरे गोव्याच्या पर्यटन क्षेत्रासाठी खरोखर फायदेशीर ठरत आहेत की करदात्यांच्या निधीचा अपव्यय होत आहे, यावर संशय व्यक्त केली . सरकारने आतापर्यंत एकूण ४० कोटी रुपये खर्च केल्याचा उल्लेख करत, हे दौरे प्रामाणिक प्रयत्न आहेत की फक्त विलासी सहली , असा सवाल त्यांनी केला.

खंवटे यांनी यावर प्रत्युत्तर देताना स्पष्ट केले की, परदेश दौऱ्यांसाठी सर्व निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडतात. तसेच, या दौऱ्यांमुळे गोवा जागतिक पर्यटन नकाशावर अधिक ठळकपणे अधोरेखित होत असल्याचा दावा त्यांनी केला. मंत्र्यांनी सभागृहात सांगितले की, पर्यटन प्रोत्साहनासाठी सहभागी एजन्सींची 'ए' आणि 'बी ' श्रेणींमध्ये निवड करण्यात येते आणि त्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली जाते.

'अतुल्य भारत २०२४' च्या अहवालानुसार, भारतात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय पर्यटकांमध्ये युनायटेड स्टेट्स दुसऱ्या क्रमांकावर असून, गोव्याच्या बाबतीत हा क्रमांक चौथा आहे. हे राज्याच्या पर्यटन क्षेत्रासाठी सकारात्मक संकेत असल्याचे खंवटे यांनी अधोरेखित केले.

विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सरकारला लक्ष्य करत, २०१९ ते २०२३ दरम्यान परदेश दौऱ्यांसाठी तब्बल ४० कोटी रुपयांचा खर्च झाल्याचे स्पष्ट केले. हा निधी निविदा प्रक्रियेद्वारे मंजूर करण्यात आला होता की वस्तुस्थितीनंतरच्या मंजुरीद्वारे, यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. मंत्र्यांनी मात्र २०२३ पासून काही आर्थिक व्यवहारांची अंतिम नोंदणी बाकी असल्याचे सांगितले. सचिव (पर्यटन) यांच्या परदेश दौऱ्यांची बिले अद्याप राजकीय मंजुरीअभावी प्रलंबित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बाणावलीचे आमदार व्हेन्झी व्हिएगस यांनी स्कॅन्डिनेव्हियन देशांतील पर्यटकांची घटती संख्या लक्षात घेऊन, अशा पर्यटकांना पुन्हा आकर्षित करण्यासाठी सरकारकडे कोणती ठोस योजना आहे, यावर प्रश्न विचारला.

खंवटे यांनी यावर उत्तर देताना सांगितले की, सरकार समुद्रकिनाऱ्यांच्या पलीकडे जाऊन पर्यटनाचा विकास करण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेत आहे. आंतरराष्ट्रीय पर्यटक आकर्षित करण्यासाठी विशेष विमान कंपन्यांना प्रोत्साहन योजना (एअरलाइन इन्सेन्टिव्ह स्कीम) सुरू करण्याचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारच्या प्रयत्नांचा मुख्य उद्देश गोव्याला एक प्रीमियम पर्यटनस्थळ म्हणून ओळख मिळवून देणे आणि उच्चस्तरीय पर्यटकांना आकर्षित करणे असल्याचेही खंवटे यांनी नमूद केले.

# अर्थव्यवस्थेत १३.८७ टक्के वाढीचा अंदाज; खाणकामाला गती येण्याची शक्यता

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६ :** मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी विधानसभेत सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालानुसार, २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी गोव्याचे सकल राज्य देशांतर्गत उत्पादन (जीएसडीपी) १,२१,३०९.०२ कोटी रुपये राहील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यामध्ये १३.८७ टक्के वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

अहवालानुसार, राज्यातील खाणपट्ट्यांच्या लिलावानंतर खाणकाम आणि उत्खनन उपक्रमांना वेग मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच, पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या विकासामुळे अर्थव्यवस्थेला अधिक चालना मिळत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

२०२३-२४ मध्ये गोव्याच्या सकल राज्य उत्पादनात १३.७३ टक्के वाढ होऊन ते १,०६,५३२.५७ कोटी रुपयांवर पोहोचले. तसेच, राज्यातील दरडोई उत्पन्न २०१९-२० मध्ये ४.८५ लाख रुपये होते, जे २०२३-२४ मध्ये वाढून ६.७४ लाख रुपयांवर गेले असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

३ सप्टेंबर २०२४ रोजी गोव्याचा क्रेडिट-डिपॉझिट रेशो (सीडीआर) ३२.६६ टक्के नोंदवण्यात आला, जो मागील वर्षीच्या ३१.८६ टक्क्यांच्या तुलनेत वाढ दर्शवतो.

२०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी महसूल अधिशेष १,७२०.१९ कोटी रुपये, वित्तीय तूट ३,१४९.४७ कोटी रुपये आणि भांडवली पावती ४,३२६.६६ कोटी रुपये राहण्याचा अंदाज आहे. तसेच, राज्याचे अंतर्गत कर्ज ३,७५०.२० कोटी रुपये राहील, असा अहवालात उल्लेख करण्यात आला आहे.

गोव्यातील लोकसंख्येच्या दशकीय वाढीचा वेग कमी होत असल्याचे निरीक्षण करण्यात आले आहे. २००१ मध्ये हा दर १५.२१ टक्के होता. दक्षिण गोव्यातील मुरगाव तालुक्यात लोकसंख्येची घनता सर्वाधिक १,४१६ व्यक्ती प्रति चौरस किलोमीटर आहे, तर सांगे तालुक्यात ती



केवळ ७३ आहे. २०२५ साठी गोव्याची अंदाजित लोकसंख्या १५.९६ लाख असण्याची शक्यता असून, २०१२ ते २०२५ दरम्यान पुरुष व महिलांची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे.

राज्याचा जन्मदर २०२२ मध्ये प्रति हजार लोकसंख्येमागे १०.८७ होता, जो २०२३ मध्ये १०.७३ पर्यंत घसरला आहे.मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी विधानसभेत कृती अहवाल सादर करताना दिलेल्या आश्वासनांची प्रभावी अंमलबजावणी झाल्याचा दावा केला. मात्र, प्रशासकीय कारणांमुळे पाच आश्वासने (१.१२%) वगळण्यात आली किंवा स्थगित ठेवण्यात आली आहेत. आतापर्यंत २७९ पैकी ११२ (सुमारे ४०%) कामे पूर्ण झाल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही स्वयंसहायता गटाला मध्यान्ह भोजन पुरवण्यापासून रोखले जाणार नाही. मात्र, हा पुरवठा केंद्र सरकारच्या २००६ च्या राष्ट्रीय प्राथमिक शिक्षण पोषण सहाय्य कार्यक्रम आणि इतर मार्गदर्शक तत्त्वांनुसार असला पाहिजे, अन्यथा करार रद्द करण्यात येईल.

माध्यान्ह भोजन पुरवठ्यासाठी सरकारने निविदा प्रक्रिया राबवली होती, ज्यात घनश्याम सेवा समिती (दिल्ली), केंद्रीय भांडार (मुंबई), नॅशनल फेडरेशन ऑफ फार्मर्स, प्रोक्युरमेंट, प्रोसेसिंग अँड रिटेलिंग कोऑपरेटिव्हज ऑफ इंडिया लिमिटेड, स्त्री शक्ती (मुंबई) आणि अक्षय पात्रा फाउंडेशन (बंगळुरू) यांनी निविदा सादर केल्या होत्या. सखोल पडताळणी केल्यानंतर, बेंगळुरूस्थित अक्षय पात्रा फाउंडेशन'ची निवड करण्यात आली.